RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : २३४ वा | मंगळवार दि ११ नोव्हेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

शिलेदाराने अचानक साथ सोडली, पवारांनीही पलटवार करत निष्ठावंताला न्याय दिला...

सोलापुरात कोणावर सोपवली मोठी जबाबदारी?

वृत्तसंस्था/सोलापूर

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात भाकरी फिरवली आहे. पक्षाच्या सोलापूर शहराध्यक्षपदी रविवारी सायंकाळी महेश गादेकर यांची नियुक्ती झाल्याचे पत्र जाहीर करण्यात आले आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी याबाबतचे पत्र जारी केले. महेश गादेकर हे १९९२ पासून शरद पवारांसोबत काम करत आले आहेत. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर महेश गादेकर यांनी काँग्रेस सोडली आणि शरद पवारांसोबत गेले. तेव्हापासून आतापर्यंत ते पवारांशी एकनिष्ठ आहेत. त्यामुळे आता शरद पवारांनी शहराध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा एकदा विश्वासू नेत्याकडे सोपवल्याने पवारांच्या राष्ट्रवादीत नवी उमेद निर्माण झाली आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी गुरुवारी अचानक राजीनामा देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. खरटमल यांच्या जागी नव्या अध्यक्षाची निवड करण्यात आली आहे. सुधीर खरटमल यांच्या अचानक राजीनाम्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत नवीन चेहऱ्याला संधी मिळणार अशी चर्चा होती. मात्र शरद पवारांनी भाकरी फिरवत जुन्या मित्राच्या खांद्यावर शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. सोलापूर जिल्हा प्रभारी हर्षवर्धन पाटील यांनी शुक्रवारी सोलापुरात येऊन बैठक घेतली होती. या बैठकीत शहराध्यक्षपदासाठी महेश गादेकर यांच्यासह माजी महापौर यू एन. बेरिया, विद्यमान सरचिटणीस चंद्रकांत पवार यांची नावे चर्चेत आली होती. पक्षाने महेश गादेकर यांची निवड केली. महेश गादेकर हे १९९२ पासून शरद पवारांसोबत काम करतात. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर त्यांनी काँग्रेस सोडली आणि पवारांसोबत गेले. तेव्हापासून आतापर्यंत ते पवारांशी एकनिष्ठ आहेत. महेश गादेकर यांनी

राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष ते शहराध्यक्ष असा राजकीय प्रवास केला आहे. पक्षाने महापालिकेची २०१२ ची निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली लढवली होती. आता महापालिका निवडणुकीच्या तोंडावर पक्षाने पुन्हा त्यांची शहराध्यक्षपदी निवड केली आहे.

निवडणूक आयोग आणि भाजपमध्ये साटेलोटे आहे का?, शरद पवारांच्या नेत्याचा गंभीर आरोप...

वृत्तसंस्था/ नागपूर

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यानंतर राजकीय वातावरण तापू लागले आहे. या निवडणुकांमध्ये नगर परिषद आणि नगर पंचायतींचा समावेश असून, सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नागपूर जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना निवडणूक आयोग आणि भाजप यांच्यातील साटेलोट्याचा गंभीर आरोप केला आहे. प्रवीण कुंटे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने ज्या पद्धतीने निवडणुकीच्या तारखा आणि अटी जाहीर केल्या, त्यात भाजप नेते आशिष शेलार यांच्या भाषणातील सूर आणि आयोगाचे धोरण हे जवळपास सारखेच दिसले. त्यामुळे आम्ही वारंवार केलेला आरोप, की आयोग आणि भाजपमध्ये काही साटेलोटे आहे का? निवडणूक आयोगाचा या पत्रकार परिषदेनेच त्या आरोपाला पुष्टी दिली आहे.फफ ते पुढे म्हणाले की, निवडणूक आता जाहीर झाली आहे, त्यामुळे आम्ही संघटनात्मक तयारीला लागलो आहोत. मी यापूर्वी जिल्हाध्यक्ष म्हणून स्पष्ट भूमिका घेतली होती की, लोकसभा, विधानसभा किंवा जिल्हा परिषद अशा सर्व निवडणुकांप्रमाणेच याही निवडणुका आम्ही महाविकास आघाडीच्या घटक पक्ष म्हणून लढवण्याच्या मानसिकतेत आहोत.फफ मात्र, काँग्रेस पक्षाच्या भूमिकेबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. काँग्रेस पक्ष आमच्याशी सन्मानपूर्वक चर्चा करण्यास तयार नसेल, तर आम्ही त्यांना वगळून इतर समविचारी पक्षांसोबत निवडणूक लढवण्याची तयारी ठेवली आहे. या संदर्भात आमच्या पातळीवर प्राथमिक चर्चाही सुरू आहे, असे प्रवीण कुंटे यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, आजपर्यंत काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याशी या संदर्भात आमचे बोलणे झालेले नाही, तसेच चर्चेसाठी आमंत्रणही आलेले नाही. काँग्रेसला आघाडी करायची की नाही, याबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे त्यांच्या भूमिकेची स्पष्टता होईपर्यंत आघाडी होईल की नाही, हे सांगणे कठीण आहे.फफ कुंटे पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रवादी शरद पवार गटाने पक्ष संघटन बळकट करण्यासाठी

तालुका आणि नगर पातळीवरील बैठकांचे नियोजन सुरू केले आहे. स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची उमेदवारीसाठी तयारी सुरु असून, पक्ष कोणत्याही परिस्थितीत स्वतंत्रपणे किंवा समविचारी पक्षांसोबत निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. असेही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नागपूर जिल्हा अध्यक्ष प्रवीण कुंटे म्हणाले.

नवे एकलव्य घडवताना...

संपादकीय लेख

रांची ही झारखंडची राजधानी आणि झारखंड म्हणजे देशातील पहिले आदिवासीबहुल राज्य. आम्ही तिथे पोचलो तेव्हा सकाळचे आठ वाजत आले होते. डिसेंबर महिन्याची सुरुवात असल्याने हवेत बऱ्यापैकी गारवा होता. एरवीही रांचीची हवा तशी गारच असते. किंबहुना म्हणूनच ब्रिटिशकाळात रांची ही बिहारची उन्हाळी राजधानी असायची. पाटण्यातील कडक उन्हाळ्यापेक्षा रांची इंग्रजांना सुसह्य वाटायची. सध्या अनेक प्रवासी कंपन्या देशभर लोकांना नेत असल्या तरी त्यांच्या कुठल्याच जाहिरातीत मी झारखंड हे नाव बघितलेले नाही. रांचीत मी खूप वर्षांपूर्वी एकदा पाच-सहा दिवस वास्तव्य केले होते. पण आत्ताचे शहर तेव्हापेक्षा खूपच अधिक गजबजलेले दिसत होते; एकाला एक लागून असलेली घरे, फेरीवाल्यांची गर्दी, अस्ताव्यस्त उभी केलेली वाहने. वर्षाला आणि मला जायचे होते ते सालगदिह गाव रांचीपासून साठ-सत्तर किलोमीटर अंतरावर होते. रांचीतून बाहेर पडल्यावर दुतर्फा पडीक जमीन आणि अधूनमधून डोंगर दिसत होते. ग्रामीण भागातून फिरताना बहुतेकदा दिसते तशी शेतीवाडी मात्र कुठेच दिसत नव्हती. त्याबद्दल मी आमच्या स्थानिक सरदारजी ड्रायव्हरकडे आश्चर्य व्यक्त केले तेव्हा तो म्हणाला ये ट्रायबल लोक ज्यादा खेती नही करते. खेतीबाडी की सिस्टिमही यहां नही है.फ आपल्या भटकत्या पूर्वजांना शेतीमुळेच लाभलेले स्थैर्य आणि त्या स्थैर्यातूनच शक्य झालेली त्यांची प्रगती अशी एक साखळी माझ्या मनात चमकून गेली. दोनतीन तासांत एकलव्य शाळेत पोचलो. रांचीला येण्यापूर्वी मी माझ्या प्रथेप्रमाणे थोडेफार संशोधन केले होते आणि त्यावेळी या शाळेला भेट द्यावी अशी शिफारस एका-दोघांनी केली होती. सुदैवाने हे गाव रांची-जमशेदपूर रस्त्यावरच होते. भोवतालचा परिसर अगदी ओसाड दिसत असला तरी शाळेची इमारत नव्यासारखी होती. साधारण पन्नाशीचे, किरकोळ बांध्याचे उपप्राचार्य दयानिधी महातो (नाव बदललेले आहे) इमारतीच्या दारातच ठरल्याप्रमाणे आमची वाट पाहत उभे होते. आम्हाला घेऊन ते आपल्या कार्यालयात गेले. चहा मागवला, शाळेची माहिती सांगू लागले. शतकानुशतके शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्यातून नवे आदिवासी नेतृत्व तयार व्हावे अशी उदात्त भूमिका त्यामागे आहे. एकलव्य हे नावच पुरेसे बोलके आहे. द्रोणाचार्यांनी आदिवासी एकलव्याला शिकवायला नकार दिला; पण त्यामुळे खचून न जाता त्यांचा पुतळा उभा करून एकलव्य स्वतःच धनुर्विद्येत प्रवीण झाला, ही कहाणी सर्वांनाच परिचित असते. अशा साधारण सातशे निवासी शाळा वेगवेगळ्या राज्यांत केंद्र सरकारने सुरू केल्या आहेत. झारखंडमधील सर्वांत मागासलेल्या भागात असलेल्या तमार तालुक्यातील सालगदिह गावातील ही शाळा त्यांतलीच एक; २००६मध्ये सुरू झालेली. ङ्गसध्या ४७० आदिवासी मुलं इथे राहतात,फ उपप्राचार्य सांगत होते. आम्ही मुलांना सीबीएससी सिलॅबसप्रमाणे उत्तम ॲकेडमिक शिक्षण तर देतोच, पण शिवाय त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणूनही खूप काय काय करत असतो. आमच्या होस्टेलमध्ये त्यांच्या राहण्याची अगदी पॉश सोय आहे. रोज सकाळी हेवी ब्रेकफास्ट असतो. आठवड्यातून दोनदा मटनदेखील असतं. कपडेदेखील शाळा पुरवतं. स्टाफचा पगार आणि इतरही सर्व खर्च केंद्र सरकार करतं. क्रीडास्पर्धा, गायनस्पर्धा, सायन्सच्या स्पर्धा या सगळ्यात आमची मुलं चमकतात.फ अभिमानाने उपप्राचार्य सांगत होते. त्यांच्या टेबलामागे दोन-तीन कपाटे वेगवेगळे चषक आणि ढालींनी भरलेली दिसत होती. सगळं श्रेय आमच्या मुलांचं,फ ते म्हणाले. अर्थात त्यांनाही त्याचा अभिमान होता हे उघड होते आणि मुलांची पार्श्वभूमी विचारात घेता ते स्वाभाविकच होते. आमची शाळा केंद्र सरकारची असली तरी प्रत्यक्ष व्यवस्थापन जमशेदपूरमधील केरला पब्लिक स्कूल ट्रस्ट ही संस्था करते. पहिलं एक वर्ष आम्हीच सगळं बघत होतो, पण नंतर लक्षात आलं, की हे सगळं मॅनेज करणं खूप अवघड आहे. मग सरकारनेच या शाळा शक्य असेल तिथे एखाद्या चांगल्या ट्रस्टकडे सोपवायचं ठरवलं,फ दयानिधी सांगत होते. २०१० सालापासून ते इथे शिक्षक म्हणून नोकरी करत आहेत. शाळा चालवताना तुम्हाला अडचणी काय काय येतातफ, असे विचारले असता सुरुवातीला ते काहीसे सावध बोलू लागले, पण हळूहळू मोकळे झाले. ते स्वतः आदिवासी असल्याने स्थानिक परिस्थितीची त्यांना उत्तम कल्पना होती. त्यांच्या अडचणी साधारण पुढीलप्रमाणे होत्या - भ्रष्टाचार ही पहिली अडचण. पैसे दिल्याशिवाय इथली एकही फाइल हलत नाही. प्रत्येक पायरीवर कोणाला किती टक्के द्यायचे ते ठरलेले असते. आपल्या कार्यकर्त्यांच्या मुलांना इथे प्रवेश मिळावा म्हणूनही राजकीय नेते बराच दबाव आणत असतात. त्यामुळे प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण न होऊ शकलेल्या अनेक मुलांनाही प्रवेश द्यावा लागतो. शाळेचा आणखीही खूप विस्तार करायची योजना आहे. त्यासाठी सरकारने शेजारची बरीच जमीन मंजूरदेखील केली आहे. पण त्या जमिनीवर लोकांनी अतिक्रमण केले आहे. स्थानिक गुंड, राजकीय कार्यकर्ते यांनाही सांभाळून घ्यावेच लागते; त्यांच्याकडूनच शाळेला लागणाऱ्या बहुतेक गोष्टी घ्याव्या लागतात; वगैरे. जरा वेळाने आम्ही शाळेच्या आवारात एक चक्कर मारली. तीन-चार ठिकाणी क्रिकेट कप्तान महेंद्र सिंग धोनीचे मोठाले फोटो लावलेले होते. झारखंडमधील ही सर्वांत लोकप्रिय व्यक्ती म्हणता येईल! क्रीडांगणावर बरीच मुले फुटबॉल, बास्केटबॉल वगैरे खेळत होती. आमच्याकडे त्यांचे लक्षच नव्हते. आज रविवार आहे ना! अख्खा दिवस मुलं खेळायला मोकळी! मुलं इथे इतकी खूश असतात की सुट्टीत घरी जायलाही ती तयार नसतात. आणि गेल्यानंतर कधी एकदा इथे परत येतो असं त्यांना झालेलं असतं,फ उपप्राचार्य म्हणाले. यावर मी त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांची एक आठवण सांगितली. नाशिक जिल्ह्यातील एका आश्रमशाळेत ते गेले होते. तेथील सर्व सुविधा उच्च दर्जाच्या होत्या. स्टेनलेस स्टीलची भांडी, लोखंडी पलंग, उत्तम कपडे वगैरे. सर्व शिक्षणतज्ज्ञांनी त्या साऱ्याचे भरपूर कौतुक केले; पण कर्मवीरांनी मात्र त्याबद्दल परखड शब्दांत नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले होते, ङ्गज्या विद्यार्थ्यांच्या आईबापांना राहण्यासाठी साध्या झोपड्याही नाहीत त्यांच्या मुलांना अशा थाटात ठेवणं अयोग्य आहे. ही मुलं सुट्टीत घरी जाणार नाहीत. त्यांना आईबापांची आणि भावंडांची ओढ राहणार नाही. त्यांनी सुट्टीत घरी गेलं पाहिजे, त्यांचा समाज सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत? BMC निवडणुकीसाठी तगडं प्लॅनिंग

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने राज्यात रणधुमाळी सुरू झाली आहे. या निवडणुकांपाठोपाठ येणाऱ्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीत आपापल्या पक्षाचे बळ वाढवायचे की, युती-आघाडीतील मित्रधर्म जपायचा, अशा कोंडीत राज्यातील सत्ताधारी आणि विरोधक सापडले आहेत. मात्र, फायदा तिथे जोडायचे आणि तोटा तिथे तोडायचे अशीच रणनीती महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी स्वीकारल्याचे दिसत आहे.दिल्लीपासून सुसाट सुटलेला सत्तेचा वारू गल्लीपर्यंत आणण्यासाठी राज्यातील महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. तर, महाविकास आघाडीचे नेते, किमान गल्लीतील सत्तेच्या निमित्ताने तरी आपले अस्तित्व शाबूत राहावे यासाठी कामाला लागले आहेत. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई यासारख्या महापालिका तसेच इतर महत्त्वाच्या नगरपालिकांमधील यशाचा टक्का घटक पक्षांपेक्षा आपल्याच खात्यात जमा व्हावा यासाठी कुठे युती करायची आणि कुठे नाही, यावरून महायुतीच्या नेत्यांचे तळ्यात-मळ्यात सुरू आहे. तर, महाविकास आघाडीतील घटक पक्ष, 'सर सलामत तो

पगडी पचास' या उक्तीप्रमाणे आघाडीचा निर्णय दुर्बिण लावून करीत आहेत. साहजिकच पहिल्या टप्प्यातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होऊनही महायुती आणि महाविकास आघाडीच्या राजकीय युतीच्या घोषणा मात्र रखडल्याचेच पाहायला मिळत आहे.राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महापालिका निवडणुका येत्या दोन महिन्यांत पार पडणार आहेत. तीन टप्प्यांत पार पडणाऱ्या या निवडणुकांचे वेळापत्रकही टप्प्याटप्प्याने निवडणूक आयोगाने जाहीर करायला सुरुवात केली आहे. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडणार आहे. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाने यासाठी आवश्यक असणारी रणनीती आखायला सुरुवात केली आहे.नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा तसेच पंचायत समित्या यासारख्या ठिकाणची सत्ता राजकीय पक्षांसाठी महत्त्वाची असतेच, मात्र त्याहीपेक्षा मोठा अर्थसंकल्प असलेल्या महापालिका या राजकीय पक्षांच्या दृष्टीने एखाद्या मिनी विधानसभेसारख्याच असल्याने, या महापालिकांतील सत्ता त्यांच्यासाठी फारच प्रतिष्ठेची असते. त्यामुळे मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड यासारख्या महापालिकांमध्ये आपल्याच पक्षाचा वरचष्मा असावा, मात्र त्याचवेळी आपल्यासोबतच्या घटक पक्षाचा तिथे फारसा हस्तक्षेप होऊन सत्तेतील मलिद्यात मोठा वाटेकरी निर्माण होऊ नये यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये आस्ते कदम सुरू असल्याचे दिसते.आगामी निवडणुकांमध्ये सर्वांत मोठा पक्ष बनण्यासाठी महायुतीमध्ये चढाओढ दिसून येत आहे, तर महाविकास आघाडीतील नेत्यांनी मात्र स्वत:ची पगडी वाचवण्यासाठी आघाडी टिकवणे वा बिघडवणे असे दोन्ही पर्याय ठेवल्याचे कळते.अशाप्रकारे दोन्ही आघाड्यांवर पडद्यामागून हालचाली सुरू असून, प्रत्येक राजकीय पक्ष राजकीय युती जाहीर करण्याऐवजी इतर सर्व पर्याय पडताळून पाहत आहे.

ठाकरेंच्या घराबाहेर अचानक पोलिसांनी गस्त वाढवली

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मुंबईतील शिवतीर्थ निवासस्थानाबाहेर पोलिसांची गस्त वाढवण्यात आली आहे. राज ठाकरेंच्या घराबाहेर अचानक गस्त का वाढवण्यात आली? याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. पण त्यामागे काहीतरी ठोस कारण असण्याची शक्यता आहे. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर हे महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. पण पोलिसांच्या या कृतीवरुन राजकारणात आरोप-प्रत्यारोपांच्या फैऱ्या झडताना दिसत आहेत. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी तर थेट सरकारवरच निशाणा साधला आहे. त्यांच्या आरोपांवर मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानाबाहेर स्थानिक पोलिसांनी गस्त वाढवली आहे. ही गस्त नेमकी का वाढवण्यात आली ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण दर दोन तासांनी राज ठाकरेंच्या घराबाहेर पोलिसांकडून गस्त घातली जात आहे. एवढंच नव्हे तर शिवतीर्थ निवासस्थानाच्या दोन्ही गेटवर स्थानिक पोलिसांनी सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

पार्थमुळे अजितदादा अडचणीत वाढ

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अडचणीत सापडला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ यांच्या जमीन खरेदीमुळे महायुती सरकारवर मोठी नामुष्की ओढवली. पुणे शहरातील मोक्याच्या जागेवरील तब्बल ४० एकरची सरकारी जमीन पार्थ पवार यांच्या कंपनीनं खरेदी केली. १८०० कोटी रुपयांची जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी केली. विशेष म्हणजे जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीत पार्थ यांची ९९ टक्के भागिदारी असतानाही या सगळ्या प्रकरणात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये पार्थ यांचं नाव नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होत असताना पार्थ यांच्यामुळे महाभारत घडलं असून राष्ट्रवादी काँग्रेस बॅकफूटवर गेली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सगळ्या प्रकरणावर पडदा टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला. जमीन सरकारी मालकीची असल्याची कल्पना पार्थ पवारांना नव्हती. हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे, असं म्हणत

अजित पवारांनी विषय संपवण्याचा प्रयत्न केला. पण हे प्रकरण गंभीर असल्याचं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खर्गे यांच्या अध्यक्षतेखालील समिती या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. विकास खर्गे यांच्या अध्यक्षतेखालील समिती महिनाभरात किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीनंतर तपास अहवाल मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करतील. या प्रकरणी गेल्या आठवड्यात गुरुवारी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली. हे प्रकरण गंभीर असून त्यामुळे तुम्ही किंवा तुमचा मुलगा अडचणीत येऊ शकता, असं फडणवीस यांनी पवारांना सांगितल्याची माहिती आहे.

मनसेचा महाविकास आघाडीत समावेश

नाशिक : आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन ठाकरे बंधू एकत्र येणार, हे जवळपास निश्चित झालं आहे. मात्र मनसेचा महाविकास आघाडीत समावेश होण्याची शक्यता धूसर मानली जात आहे. अशातच नाशिकमध्ये मोठी राजकीय घडामोड घडली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी आणि मनसे एकत्र लढणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.राज्यात मनसे अजून महाविकास आघाडीत अधिकृतपणे सामील झालेली नसताना, नाशिकमध्ये भाजपला रोखण्यासाठी ही युती करण्यात आल्याचं पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ पातळीवर भूमिका स्पष्ट नसतानाही नाशिकमधील काँग्रेस आणि मनसेच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत एकत्र येऊन ही घोषणा केली.

मोदींच्या रॅलींमधून नितीश कुमार गायब; निकालानंतर पलटी मारणार?

नवी दिल्ली/पाटणा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांना मुख्यमंत्री आणि जेडीयूचे अध्यक्ष नितीश कुमार अनुपस्थित राहायचे. त्यामुळे एनडीएमध्ये सगळं काही आलबेल नसल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. नितीश कुमार यांनी याआधी पलटी मारल्यानं निवडणूक निकालानंतर ते वेगळाच गेम करणार का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यावर भाजपकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.पंतप्रधान मोदी यांच्या रॅलींना, सभांमधील नितीश कुमार यांची अनुपस्थिती रणनीतीचा भाग असल्याचं केंद्रीय मंत्री आणि बिहार विधानसभा निवडणुकीचे भाजपचे प्रभारी धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं. प्रत्येक नेता वैयक्तिक रुपात प्रचार करेल, अशी एनडीएची योजना होती, असं प्रधान म्हणाले. निवडणुकीआधी पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्री नितीश कुमार आणि बिहार सरकारच्या निमंत्रणावर ७-८ सरकारी

कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला होता, याकडे प्रधान यांनी लक्ष वेधलं.'२४ ऑक्टोबरला जननायक कर्पूरी ठाकूर यांच्या समस्तीपूर जिल्ह्यातून निवडणूक प्रचार सुरु झाला. तिथे पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री नितीश कुमार, उपेंद्र कुशवाहा आणि चिराग पासवान यांच्यासह एनडीएचे सगळे नेते उपस्थित होते. मोदी आणि नितीश यांच्या स्वतंत्र सभा हा आमच्या रणनीतीचा भाग होता. आम्ही सगळे वैयक्तिक रुपात निवडणूक प्रचार करु, असं ठरलेलं होतं,' असं प्रधान यांनी सांगितलं. धर्मेंद्र प्रधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे निकटवर्तीय मानले जातात.

मुंबई महापालिकेसाठी मनसेचं सर्वेक्षण, १२५ जागांवर मोठे अपडेट

मुंबई : मुंबई महापालिकेसह राज्यभरातील महत्त्वाच्या आगामी निवडणुकांमध्ये ठाकरे बंधू एकत्रित ताकद लावणं निश्चित मानलं जात आहे. ठाकरे गट आणि मनसे यांची युती अद्याप अधिकृतरित्या जाहीर झालेली नाही, मात्र दोन्ही पक्षांतील नेत्यांच्या वाढत्या गाठीभेटी, एकत्रित मोर्चे यावरुन केवळ घोषणेची औपचारिकता बाकी असल्याचे दिसते. अशातच जागावाटपाच्या चर्चे आधीच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सर्वेक्षण केले आहे. यामध्ये मुंबईत मनसेची कुठल्या भागात, किती जागांवर ताकद आहे, याचे चित्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासमोर स्पष्ट झाले आहे.मुंबई महापालिकेच्या २२७ पैकी तब्बल

१२५ जागांवर मनसेची ताकद आहे. या सव्वाशे जागांसाठी मनसेकडे चांगले उमेदवार असून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास ते तयार असल्याचीही माहिती आहे. ठाकरेंसोबत युती करण्याआधी मनसेने मुंबई महापालिकेच्या २२७ जागांचा आढावा घेतला. त्यानुसार १२५ ताकदवान जागांची यादी सादर केली. मुंबई महापालिकेची आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेमध्ये जागावाटपाची चर्चा सुरु होण्याची शक्यता आहे.गेल्या काही दिवसांपासून ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचे मुंबईतील नेते, पदाधिकारी, शाखाप्रमुख, शाखा अध्यक्ष यांच्या बैठका सुरु आहेत. मनसेची शहरात कुठे कुठे ताकद आहे, याचा आढावा बैठकांमध्ये घेतला जात आहे. मनसेने आतापर्यंत १२५ जागांची यादी काढल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये मुख्यत्वे माहीम, दादर, परळ, भायखळा, जोगेश्वरी, भांडूप , घाटकोपर यासारख्या मराठीबहुल भागांचा समावेश आहे.ठिकाणी मनसेच्या मतांची संख्या जास्त असून याआधी झालेल्या मुंबई महापालिका किंवा विधानसभा निवडणुकांतही तिथे मनसेला चांगली मतं मिळाली होती. मुंबई महापालिकेच्या २२७ पैकी तब्बल १२५ जागांवर लढण्यास मनसे आग्रही आहे, असा याचा अजिबात अर्थ नाही. ठाकरे गट आणि मनसे यांच्यात प्रत्यक्ष जागावाटपाच्या चर्चेला सुरुवात झाली नसली तरी दोन्ही पक्षांनी आपली ताकद अधिक असलेल्या जागा शॉर्टलिस्ट केल्या आहेत. प्रत्यक्ष जागावाटप होईल तेव्हा मेरिटनुसार कोण कुठल्या जागेवर लढणार, हे ठरण्याचे संकेत मिळत आहेत. पुढील वाटाघाटी झाल्यावर कोण किती जागांवर लढणार हे स्पष्ट होईल.

शेजारचं दुकान फोडून ज्वेलर्सच्या दुकानात एन्ट्री, बोगदा करुन सिनेस्टाईल चोरी

पालघर : पालघर शहरातील मुख्य बाजारपेठ पेठेत असलेल्या नाकोडा ज्वेलर्स या ज्वेलर्स दुकानात चोरी झाल्याची घटना घडली आहे. चोरट्यांनी ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपये किमतीचे सोने आणि चांदीचे दागिने, २० लाख रोख असा एकूण ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी घरफोडी करून चोरून नेला आहे. याप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

पालघर शहरातील अशोका अंबर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील नाकोडा ज्वेलर्स दुकानाचे मालक पीयूष दिनेश जैन ज्वेलर्स दुकान बंद करून आपल्या घरी निघून गेले. चोरट्यांनी ज्वेलर्स दुकानाच्या शेजारी असलेल्या जान्हवी फॅशन या कपड्याच्या दुकानात शटर तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपड्याच्या दुकानातील भिंतीला बोगदा करून नाकोडा ज्वेलर्स दुकानात शिरले. ज्वेलर्स दुकानातील तिजोरी गॅस कटरने कापून त्यात ठेवलेल्या ९२ सोन्याच्या चैन, ३१ नेकलेस, २७१ अंगठ्या, ३५९ कानातील एअररिंग्स टॉप्स आणि झुमके, १२० कानातील रिंग्स, ९२ मंगळसूत्राला लावण्यात येणारे पेंडल, १४६ सोन्याच्या चैनचे पेंडल, १९ कानचैन, ११८ मंगळसूत्राच्या वाटी, ८ ब्रेसलेट, १२ कानातले लटकन, बारा सोन्याचे कॉइन, ४० किलो चांदीचे दागिने आणि २० लाख रुपये रोख रक्कम

असा एकूण ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपयांचा ऐवज चोरून चोरटे पसार झाले. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून घटनेची माहिती मिळाल्यानंतर पालघर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व संपूर्ण घटनास्थळाची पाहणी करा घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ५ ते ६ चोरटे ही घरफोडीसाठी आले असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात समोर आलं आहे. अंबर शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे दुकानदारांनी एकत्रित रित्या ठेवलेल्या सुरक्षारक्षक दिपक सिंग आणि नरेश दोघांनी संगनमत करून अन्य साथीदारांच्या मदतीने ज्वेलर्स दुकानात चोरी केल्याची माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात आरोपी सुरक्षारक्षक दिपक सिंग, नरेश व अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५(१), ३३१(३), ३३१(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरमहा दहा हजार व्याजाचं आमिष, कोकणात कोट्यवधींचा घोटाळा

रायगड : मुरुड शहरात गाजत असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणूक घोटाळा प्रकरणात आणखी एक मोठे नाव समोर आले आहे. गुंतवणूकदारांना दरमहा दहा हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवत कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणारा प्रसन्न पुलेकर आधीच तुरुंगात आहे. आता या प्रकरणात विशाल शिंपी याला पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने शिंपीला दहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मुरुड आणि परिसरातील अनेक नागरिकांनी प्रसन्न पुलेकर याच्याकडे लाखो रुपयांची गुंतवणूक केली होती. परंतु ठरल्याप्रमाणे व्याज किंवा मूळ रक्कम न मिळाल्याने गुंतवणूकदारांनी संताप व्यक्त केला. मुख्य तक्रारदार महेश भगत यांच्यासह १३६ जणांनी मुरुड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी तपास अधिक गतीमान केला. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती विशाल शिंपी याच्या नावाचे बँक स्टेटमेंट्स आणि आर्थिक व्यवहारांचे पुरावे लागले. या

व्यवहारांबाबत समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यामुळे पोलिसांनी शिंपीला अटक केली. पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु असून आतापर्यंत १५ हून अधिक जणांची सखोल चौकशी करण्यात आली आहे. विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्रसन्न पुलेकर याने शहरातील काही प्रभावशाली व्यक्तींच्या माध्यमातून अवैध आर्थिक व्यवहार केले होते. या व्यवहारांमध्ये विशाल शिंपी याचा थेट सहभाग असल्याची शक्यता तपासात व्यक्त केली जात आहे. सध्या मुरुड पोलिसांकडून सर्व बँक खाती आणि व्यवहारांची काटेकोर तपासणी सुरु आहे.या घोटाळ्यामुळे मुरुड शहरात एकच खळबळ उडाली असून गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

लाल किल्ल्याजवळ स्फोट, Hyundai i20 कार चालकाचा चेहरा समोर

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण स्फोटात आठ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत. हा स्फोट सोमवारी संध्याकाळी एका Hyundai i20 गाडीत झाला. स्फोटापूर्वी ही गाडी लाल किल्ल्याजवळील सुनहरी मशीद परिसरात सुमारे तीन तास उभी होती. स्फोटाच्या काही मिनिट आधीचे सीसीटीव्ही फूटेज समोर आले असून यामध्ये कार चालकाचा चेहरा कैद झाला आहे.स्फोटाच्या वेळी लाल किल्ला परिसर पर्यटकांनी गजबजलेला होता. स्फोट सोमवारी सायंकाळी ६.५२ वाजता झाला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये गाडी दुपारी ३.१९ वाजता पार्किंग लॉटमध्ये शिरताना आणि सायंकाळी ६.४८ वाजता बाहेर पडताना दिसली. सुरुवातीला गाडी चालवणारा चेहरा स्पष्ट दिसत होता, पण नंतर गाडी पुढे सरकल्यावर स्टिअरिंगवर एक मास्क घातलेला माणूस दिसतो.स्फोटाच्या ठिकाणापर्यंत गाडी कुठल्या मार्गाने

आली, याचा अंशतः शोध दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने घेतला आहे. गाडीने बदरपूर सीमेवरुन शहरात प्रवेश केल्याचे दिसून आले आहे, मात्र पुढील मार्गाचा तपास सुरू आहे.दरम्यान, स्फोट झालेली Hyundai i20 गाडी मूळ मोहम्मद सलमानच्या मालकीची होती. त्याला सोमवारी रात्री अटक करण्यात आली. त्यानंतर ही गाडी अनेक वेळा विकली गेल्याचे समोर आले आहे. प्रथम नदीमने, नंतर फरिदाबाद सेक्टर ३७ मधील रॉयल कार झोन या युज्ड कार डीलरकडे गेली. या डीलरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, सर्व मोबाईल नंबर बंद असल्याचे आढळले. त्यानंतर ही गाडी पुलवामा येथील तारिकने विकत घेतली. नंतर मोहम्मद उमरने, जो सध्या फरार आहे.

दारुच्या नशेत शिवीगाळ केल्याचा राग, दोघांनी कट रचून मित्राला संपवलं

सांगली : सांगलीतील आपटा पोलीस चौकीजवळच असलेल्या एका घोड्याच्या तबेल्यात अश्लील शिवीगाळ केल्याच्या रागातून एका तरुणाचा त्याच्याच दोघा मित्रांनी निर्घृण खून केला. अमीर रावसाहेब कन्नुरे असं खून झालेल्या तरुणाचं नाव आहे. जमील कुरणे यांच्या घोड्याच्या तबेल्यात मध्यरात्रीनंतर हा प्रकार घडला. खुनानंतर विश्रामबाग पोलिसांनी तातडीने सुत्रं हलवून हल्लेखोर मलिक ऊर्फ मलक्या दस्तगीर मुलाणी आणि निशांत भिमसेन दासुद या दोघांना अटक केली.अमीर कन्नुरे हा गेल्या पाच-सहा वर्षापासून कुरणे यांच्या तबेल्यात झोपायला असायचा. तेथील किरकोळ कामे करत होता. अमीर याला दारूचं व्यसन होतं. संशयित मलिक आणि निशांत हे दोघे त्याचे मित्र होते. तिघांना दारूचं व्यसन असल्यामुळे तिघेजण बऱ्याचदा एकत्र दारू पित होते. अमीर आणि संशयित मलिक, निशांत हे काल रविवारी सायंकाळी एकत्र आले होते. तेव्हा अमीर याने त्यांना अश्लील शिवीगाळ केली होती. त्यामुळे दोघांना त्याचा राग आला होता. याच रागाच्या भरातून दोघांनी अमीरचा काटा काढायचं ठरवलं.रात्री अकराच्या सुमारास अमीर तबेल्याच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या पत्र्याच्या खोलीत झोपायला गेला. तर तबेल्यात काम करणारा त्याचा साथीदार नितीन बाळू जाधव

हा त्याच्या मित्रांसोबत तबेल्याच्या बाहेर गप्पा मारत बसला होता. काहीवेळाने मित्र निघून गेल्यानंतर नितीन झोपायला आतमध्ये आला. काही वेळानंतर झोपण्यापूर्वी नितीन हा लघुशंकेसाठी बाहेर आला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ऑफीससमोरील बोळात तो गेला.

दरम्यान, संशयित मलिक आणि निशांत हे दोघेजण अमीरचा काटा काढायचा म्हणून तबेल्यापासून काही अंतरावर थांबलेले होते. नितीन तबेल्यातून बाहेर पडल्याचे पाहून दोघेजण आतमध्ये आले. अमीर झोपलेल्या खोलीला दरवाजा नव्हता. त्यांनी आत आल्यानंतर अमीरच्या तोंडावर एडक्यासारख्या हत्याराने वार केले. तेवढ्यात नितीन हा लघुशंका करून तबेल्यात परतत होता. त्याला दोघेजण पळून जाताना दिसले. त्याने एकाचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा दुचाकी सोडून तो पळाला. नितीन पळत तबेल्यात आला. तेव्हा अमीरवर हल्ला झाल्याचे दिसून आले. त्याने तात्काळ कुरणे यांना कळवलं. जखमी अमीर याला तात्काळ सिव्हीलमध्ये हलवले. परंतू स्ट्रेचरवरून त्याला खाली उतरवत असतानाच त्याचा मृत्यू झाला.

मोबाईल घरी विसरली म्हणून घरी गेली आणि...! भारतीय महिला हॉकी खेळाडूचा अपघातात मृत्यू

मुंबई : रविवारी लखनऊमध्ये झालेल्या एक रस्ते अपघातात नॅशनल एथलिट आणि हॉकी प्लेअर ज्युली यादवचा मृत्यू झाला आहे. ज्युली एलपीएस शाळेत स्पोर्ट्स टीचर होती. बॅडमिंटन चॅम्पियनशिपसाठी ती शाळेत जात होती. मिळालेल्या माहितीनुसार, ज्युलीला घरातून फोन आला होता, त्यावेळी ती घरी परतत असताना तिच्या बाईकची टक्कर ट्रकशी झाली असता या अपघातात तिचा मृत्यू झाला आहे.

लखनऊच्या पारा ठाणे भागात असलेल्या एका वळणावर ही घटना घडलीय. मृत व्यक्ती ज्युली २३ वर्षांची होती. ज्युली एलडीए कॉलनी सेक्टर- आयम ध्ये असलेल्या एलपीएल शाळेत प्रायमरी विभागात स्पोर्ट्स टीचर होती. रविवारी सकाळी शाळेत इंटर स्कूल बॅडमिंटन चॅम्पियनशिप होणार होती. या चॅम्पियनिपची ती इन्चार्ज होती. समोर आलेल्या माहितीनुसार, ज्युली सकाळी लवकर शाळेत पोहोचली होती. मात्र तिला शाळेत गेल्यावर समजलं की, ती तिचा फोन घरीच विसरून आलीये.त्यामुळे

तिने तात्काळ तिची बाईक घेतली आणि घरी परली. परंतु मौदा मोडजवळ सिलेंडरने भरलेल्या ट्रकने तिला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ज्युली रस्त्यावर कोसळली आणि ट्रकचे चाक तिच्या अंगावरून गेलं. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ ॲम्ब्युलन्सला फोन करून तिला ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल केलं. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला होता आणि डॉक्टरांनी ज्युलीला मृत घोषित केलं. ज्युली यादवच्या अचानक मृत्यूमुळे तिच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. वडील अजय यादव आणि आई या दोघांची अवस्था अत्यंत वाईट असून त्या खूप मोठा धक्का बसला आहे. कुटुंबीयांनी सांगितलं की, ज्युली अत्यंत प्रेमळ आणि मदतीस तत्पर मुलगी होती.

ज्युली मौदा गावातील रहिवासी होती आणि तिच्या मृत्यूमुळे संपूर्ण गावात तसंच तिच्या शाळेत शोकाचं वातावरण आहे. तिच्या सोबत काम करणाऱ्या व्यक्ती आणि शिक्षकांनीही तिच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली आहे. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी पारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी माहिती दिली की, घटनेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत आणि ट्रक चालकाचा शोध सुरू आहे. यावेळी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केलंय की, जर कोणाकडे या अपघातासंदर्भात कोणतीही माहिती असेल, तर त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा.

चेन्नई सुपर किंग्सची संजू सॅमसनसाठी मोठी ऑफर

एकाच्या जागी दोन खेळाडू देणार अनब सर्वात मोठं पदही

नवी दिल्ली : संजू सॅमसनला संघात स्थान देण्यासाठी आता CSK सर्वात मोठी ऑफर देत असल्याचे समोर आले आहे. संजू सॅमसन या एका खेळाडूला आपल्या संघात स्थान देण्यासाठी चेन्नईचा संघ आता दोन खेळाडू राजस्थान रॉयल्सला सुपूर्द करायला तयार झाला आहे. त्याचबरोबर चेन्नईचा संघ एक मोठे पदही यावेळी देण्यात असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे ही सर्वात मोठी डील आहे तरी काय, याची माहिती आता समोर आली आहे.

संजू सॅमसन हा सध्याच्या घडीला राजस्थान रॉयल्सकडे आहे. पण आयपीएलचा लिलाव सुरु होण्यापूर्वी IPL Trade होत असतो. या देवाण घेवाणीत कोणतेही संघ आपले आवडते खेळाडू देऊ शकतात, पण पहिली गोष्ट म्हणजे त्या

खेळाडूला देण्यासाठी समोरचा संघ तयार असायला हवा. दुसरी गोष्ट म्हणजे एका खेळाडूला जर संघात घ्यायचे असेल तर त्यांना समोरच्या संघाला एक आपल्या संघातील खेळाडू द्यावा लागतो, पण यावेळी CSK संजूच्या जागी चक्क दोन खेळाडू द्यायला तयार झाली आहे.संजू सॅमसन या एका खेळाडूला संघात स्थान देण्यासाठी CSKचा संघ चक्क दोन खेळाडू राजस्थान रॉयल्सच्या संघाला सुपूर्द करायला तयार आहे. संजू सॅमसनच्या जागी रवींद्र जडेजाला ते राजस्थानच्या संघाला देणार असल्याचे म्हटले होते. पण त्यानंतर त्यांनी आपली ऑफर बदलली. आता संजूसाठी ते रवींद्र जडेजा आणि सॅम करन या दोन्ही खेळाडूंना राजस्थानला द्यायला तयार झाले आहेत.

संजूला संघात स्थान देण्यासाठी आता उडघ आपल्या संघाची कॅप्टन्सी त्याला देण्यासाठी तयार असल्याचेही आता समोर येत आहे. त्यामुळे आता संजूला चेन्नई सुपर किंग्सच्या संघात मोठे स्थान मिळू शकते, असे म्हटले जात आहे.संजू सॅम सनसाठी आता उडघ ने सर्वात मोठी डील समोर आणली आहे. त्यामुळे आता संजू त्यांच्या संघात जाईल, असे वाटत आहे. पण आता संजू नेमका काय निर्णय घेतो, याकडे लक्ष लागलेले असेल.

षटकारांचं वादळ, ११ चेंडूत ८ षटकार; युवा फलंदाजाचा विश्विविक्रम

दिल्ली : रणजी ट्रॉफी २०२५-२६ राऊंड ४ चा सामना ८ नोव्हेंबर रोजीपासून खेळण्यात येत आहे. प्ले ग्रुपमध्ये मेघालय आणि अरुणाचल प्रदेशचा संघ आमनेसामने आला आहे. याच साम न्यात मेघालयच्या २५ वर्षीय आकाश कुमारने फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये सर्वात जलद अर्धशतक ठोकण्याचा विक्रम केला आहे. त्याने ८ षटकारांच्या मदतीने ११ चेंडूत अर्धशतक ठोकलं.

पहिल्यांदा फलंदाजी करताना मेघालयने १२७ षटकात ६ गडी गमावून ६२८ धावा कुटल्या. अर्पित भाटेवारा याने २०७३ चेंडूत २०७ धावा केल्या. त्याने २३ चौकाराच्या व्यतिरिक्त ४ षटकार ठोकले. या व्यतिरिक्त अलावा किशन लिंगदोह याने देखील १८७ चेंडूत ११९ धावा केल्या. राहुल दलालने १०२ चेंडूत १४४ धावा कुटल्या. तर आकाश कुमार चौधरीने १४ चेंडूत ५० धावा करत इतिहास रचला. आकाश कुमारने आतापर्यंत ३० फर्स्ट क्लास सामन्यात १४.३७ सरासरीने ५०३ धावा केल्या आहेत. या व्यतिरिक्त त्याने २८ लिस्ट ए सामन्यात १५.६१ सरासरीने २०२३ धावा केल्या आहेत.

आकाशने ३० टी-२० सामन्यात १०७ धावा केल्या आहेत. आकाशने विश्वविक्रम केला आहे. त्याने २०१२ साली एसेक्सच्या विरोधात लीसेस्टरशायरकडून खेळताना १२ चेंडूत अर्धशतक ठोकलं होतं. आता आकाशने ११ चेंडूत अर्धशतक ठोकलं . त्याने ६ चेंडूत ६ षटकार ठोकले. आकाशने १४ चेंडूत नाबाद १४ धावा केल्या.

चॅम्पियन बनले पण फॉलो भारतालाच करतायेत ; पाकिस्तानी खेळाडूने हार्दिकची 'ती' गोष्ट केली कॉपी ; झहीं व्हायरल

हाँगकाँग : हाँगकाँग सिक्स २०२५ ची स्पर्धा नुकतीच रंगली. या स्पर्धे त पाकिस्तानने बाजी मारली. पाकिस्तानच्या संघाने तब्बल सहाव्यांदा ही स्पर्धा जिंकली. पाकिस्तानला भारताने पराभूत केले पण नंतर सलग चार सामने गमावले. पाकिस्तनने भारताविरुद्ध सामना गमावला पण नंतरचे सामने जिंकले. पण आता जरी पाकिस्तान चॅम्पियन बनली असली तरीही चर्चा हार्दिक पंड्याची होत आहे.

हाँगकाँग सिक्स २०२५च्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा सामना कुवेतशी झाला. पाकिस्तानने कुवेतचा ४३ धावांनी पराभव केला आणि हाँगकाँग सिक्समध्ये विक्रमी सहाव्यांदा विजय मि

ळवला. पाकिस्तानपेक्षा इतर कोणत्याही संघाने ही ट्रॉफी जास्त जिंकलेली नाही. स्पर्धा जिंकल्यानंतर, पाकिस्तानच्या खेळाडूने हार्दिक पंड्यासारखा आनंद साजरा केला. पाकिस्तानी क्रिकेटपटूचा फोटोही व्हायरल होत आहे.पाकिस्तानी क्रिकेटपटू मुहम्मद शहजादने इंस्टाग्रामवर एक फोटो शेअर केला. फोटोमध्ये, शहजाद हार्दिक पंड्यासारखी पोझ करुन उभा आहे. तो ट्रॉफी समोर ठेवून आणि खांदे वर करून पोज देत आहे.

भारताने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर हार्दिकने अशा प्रकारे फोटो काढला होता आणि तो सोशल मीडियीवर मोठ्या प्रमाणात व्हायरलही झाला होता. त्यानंतर, हार्दिकने अशीच पोझ देऊन २०२५चा चॅम्पियन्स ट्रॉफी आणि अलिकडचा आशिया कप जिंकल्यानंतर एक फोटो शेअर केला. यामुळे हार्दिकच्या या पोझची किती क्रेझ आहे हे यावरुन समजते.कुवेतने पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांचा निर्णय चुकीचा ठरला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ६ षटकांत ३ गडी गमावून १३५ धावा केल्या. अब्दुल सम दने १३ चेंडूंत ४२ धावा केल्या. ११ चेंडूंत ५२ धावा केल्यानंतर कर्णधार अब्बास आफ्रिदी निवृत्त झाला. ख्वाजा नाफेने ६ चेंडूंत २२ धावा केल्या. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना कुवेतला ५.१ षटकांत फक्त ९२ धावा करता आल्या आणि ४३ धावांनी सामना गम ावावा लागला. पाकिस्तानकडून माझ सदाकतने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या.

लिव्हर इन्फेक्शनने तमिल अभिनेत्याचा ४४ व्या वर्षी मृत्यू



चेन्नई : दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतून एक दुःखद बातमी समोर आली आहे. आपल्या अभिनयाच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मन जिंकणारा प्रसिद्ध तमिळ अभिनेता अभिनयचे निधन झाले. अवघ्या ४४ व्या वर्षी त्याने जगाचा निरोप घेतला. लिव्हर इन्फेक्शनमुळे तो गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त होता. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान सोमवारी सकाळी त्याने अखेरचा श्वास घेतला. अभिनयच्या मृत्यूचे वृत्त कळताच फक्त चित्रपटसृष्टीच नाही तर त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे ४ वाजता अभिनयने अखेरचा श्वास घेतला. अभिनय गेल्या अनेक वर्षांपासून किडनी आणि लिव्हरशी संबंधित आजाराने त्रस्त होता. त्याच्या लिव्हरमध्ये इन्फेक्शन खूपच वाढले होते. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे अभिनेता उपचार करू शकला नव्हता. त्यामुळे त्याने सोशल मीडियावर पोस्ट करत मदत करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांनी त्याला मदत केली.

अभिनेता अभिनयच्या कारकिर्दीची सुरुवात २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'थुल्लुवधो इलमई' या चित्रपटातून झाली. या चित्रपटात धनुष आणि शेरीन यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. हा चित्रपट हिट झाला आणि अभिनयला खूप चांगली प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर, त्याने 'जंक्शन', 'सिंगारा चेन्नई' आणि ''पोन मेघलाई' यासारख्या चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या. अभिनयला त्याला जास्त काळ मुख्य भूमिका मिळाली नाही. त्याने अनेक दमदार सहाय्यक भूमिका साकारल्या.

अभिनयने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. अभिनयने डबिंग आर्टिस्ट म्हणूनही काम केले. त्याने अनेक मोठ्या कलाकारांना आपला आवाज दिला. अभिनयच्या अचानक जाण्याने फक्त त्याच्या चाहत्यांनाच नाही तर दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील कलाकारांनाही धक्का बसला आहे. साऊथमधील कलाकार आणि अभिनयचे चाहते सोशल मीडियावर त्याला श्रद्धांजली वाहत आहेत. दरम्यान, मृत्यूपूर्वी अभिनयचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये त्याने चेक्सचा शर्ट आणि पँट घातली होती. त्याचे वजन खूपच कमी आणि तब्येत खूपच खराब झालेली दिसत होती. तो ओळखीतही येत नव्हता.

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती खालावली

कुटुंबातील सर्व सदस्य पोहोचले रुग्णालयात

मुंबई : ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त होत आहे. ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या चिंताजनक असून, त्यांच्या दोन्ही मुलींना अमेरिकेतून भारतात बोलावण्यात आले आल्याची माहिती समोर येत आहे. कुटुंबातील अनेक सदस्य रुग्णालयात उपस्थित आहेत.

डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. डॉक्टरांचे म्हणणे आहे की पुढील ७२ तास धर्मेंद्र यांच्यासाठी अत्यंत कठीण असतील. धर्मेंद्र हे बऱ्याच काळापासून वयोमानाशी संबंधित आजारांशी झुंज देत आहेत.

ते काही दिवसांपासून आयसीयूमध्ये आहेत. धर्मेंद्र यांना ३१ ऑक्टोबर रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना नियमित तपासणीसाठी दाखल करण्यात आल्याचे वृत्त होते. धर्मेंद्र गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ लोकांचे मनोरंजन करत आहेत. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक उत्कृष्ट चित्रपट दिले आहेत.

खलिस्तानीकडून दिलजीतला आणखी एक धमकी

मुंबई : पंजाबी गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझ सध्या त्याच्या 'ऑरा' टूरवर आहे. अमेरिकन खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूच्या इशाऱ्यानंतर त्याला नवीन धमक्या मिळाल्या आहेत. पर्थमधील गायकाच्या कॉन्सर्टमध्ये खलिस्तान समर्थकांच्या घोषणा देण्यात आल्या होत्या. आता, खलिस्तानी समर्थकांनी न्यूझीलंडमधील ऑकलंडमध्ये त्याचा आगामी कॉन्सर्ट खराब करण्याची धमकी दिली आहे. कौन बनेगा करोडपती १७ च्या प्रोमोमध्ये दिलजीत दोसांझ अमिताभ बच्चन यांच्या पायांना स्पर्श करताना दिसल्याने वाद निर्माण झाला. त्यानंतर, खलिस्तानी दहशतवादी गटाने २९ ऑक्टोबर रोजी गायकाला धमक्या दिल्या.

चिलगम गाण्यावरून मलायका अरोरा झाली ट्रोल

मुंबई : हनी सिंगचे भोजपुरी थीम असलेले 'चिलगम' हे गाणे रिलीज झाले, ५२ वर्षीय मलायका अरोराच्या नृत्यावर वापरकर्त्यांनी प्रतिक्रिया दिल्या.

रॅपर यो यो हनी सिंगचे नवीन गाणे 'चिलगम' शनिवारी रिलीज झाले. या गाण्यात यो यो हनी सिंगचा रॅप आहे, तर भोजपुरी बोल रागिणी विश्वकर्मा यांनी गायले आहेत. हे गाणे यो यो हनी सिंग आणि मलायका अरोरावर चित्रित केले आहे. यो यो हनी सिंगच्या गाण्यावर आणि मलायका अरोराच्या नृत्यावर वापरकर्त्यांनी देखील प्रतिक्रिया दिल्या आहेत.

यो यो हनी सिंगने गाण्यात भोजपुरी टच जोडला आहे. 'चिलगम' या नवीन गाण्यात हनी सिंग वेगळा दिसत आहे. इंस्टाग्रामवर गाणे शेअर करताना रॅपरने लिहिले की, 'प्रतीक्षा संपली आहे. चिलगमचा व्हिडिओ मोठ्या बीट्स, बोल्ड मूव्हज आणि योग्य व्हायब्ससह आला आहे.' गाण्यात मलायका अरोरा त्याच्यासोबत नाचते. मलायका अरोरा सध्या ५२ वर्षांची आहे. तथापि, हनी सिंगच्या गाण्यातील तिच्या नृत्याच्या हालचालींवर वापरकर्त्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया आल्या आहेत. अनेक वापरकर्त्यांनी गाण्यातील तिच्या नृत्याच्या हालचाली आवडल्या, तर काहींनी त्या नापसंत केल्या. काहींनी असे सुचवले की तिच्या जागी भोजपुरी अभिनेत्री अक्षरा सिंगला कास्ट करावे.

प्रसिद्ध मॉडेलचा संशयास्पद मृत्यू

भोपाल : मध्य प्रदेशची राजधानी भोपालमधील मॉडेल खुशबू अहिरवार हिचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. तिचे कुटुंबीय प्रेमाने खुशी म्हणायचे. खुशबूच्या मृत्यूने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. खुशबूचा रविवारी रात्री ११ वाजता मृत्यू झाला. तिच्या मृत्यूवरून अनेक सवाल उपस्थित केले जात आहेत. खुशबूच्या आईने प्रियकर कासिम अहमदवर हत्येचा गंभीर आरोप केला आहे. खुशबूचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदनाचा अहवाल समोर आल्यानंतर तिच्या मृत्यूचे कारण समोर येईल. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कासिम अहमद याचं आधी देखील काही गुन्ह्यात नाव समोर आलं. बेकायदेशीर दारू विक्री प्रकरणात तुरुंगात शिक्षा भोगून आला आहे.

प्रेम चोपड़ा यांची प्रकृती बिघडली

मुंबई : बॉलिवूडचे ज्येष्ठ आणि सर्वमान्य खलनायक अभिनेते प्रेम चोपड़ा यांना प्रकृती बिघडल्याने मुंबईतीललिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या आरोग्याविषयी विविध अफवा पसरल्यानंतर डॉक्टर आणि कुटुंबीयांनी अधिकृत माहिती देत सांगितले की, प्रेम चोपड़ा यांची प्रकृती आता स्थिर आहे आणि ते उत्तमरीत्या बरे होत आहेत.

डॉक्टरांच्या माहितीनुसार, प्रेम चोपड़ा यांना वयामुळे काही आरोग्यविषयक समस्या उद्भवल्या होत्या. काही दिवसांपासून त्यांना थकवा आणि श्वसनासंबंधी त्रास जाणवत होता, त्यामुळे तपासणीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर योग्य उपचार सुरू असून, त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आलेले नाही. डॉक्टरांनी सांगितले की ते सामान्य वॉर्डमध्येच आराम करत आहेत आणि त्यांची स्थिती नियंत्रणात आहे. अभिनेता विकास भल्ला, जे प्रेम चोपड़ा यांचे जावई आहेत, त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, प्रेमजींची तब्येत सुधारत आहे. काही विशेष चिंता करण्यासारखे नाही. वयाच्या कारणामुळे काळजी घेतली जात आहे, पण डॉक्टरांनी सांगितले आहे की ते लवकरच घरी परततील. रुग्णालयातील सूत्रांच्या माहितीनुसार, प्रेम चोपड़ा यांना आणखी दोन ते तीन दिवसांत डिस्चार्ज मिळू शकतो. डॉक्टरांनी सांगितले की, त्यांची तब्येत स्थिर आहे आणि पुनर्प्राप्तीची प्रक्रिया चांगली सुरू आहे. प्रेम चोपड़ा हे बॉलिवूडमधील लोकप्रिय खलनायकांपैकी एक असून, त्यांनी आपल्या सहा दशकांच्या कारकिर्दीत ३५० हून अधिक चित्रपटांत काम केले आहे. 'बॉबी', 'दो रास्ते', 'उपकार', 'कटी पतंग' आणि 'कला पत्थर' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवला आहे.

सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना; सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या रबी हंगामासाठी राबविण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी रब्बी ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर तर गहू, हरबरा कांद्यासाठी १५ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाचे तंत्र अधिकारी समृद्धी वांगसकर यांनी केले आहे. जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे. योजनचा उद्देश : नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल. योजनेचे वैशिष्टे : सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत गहू, हरबरा व कांदा पिकांकरीता रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल. योजने अंतर्गत रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील. पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर गहूसाठी ४५० रुपये, हरबरा ४५० रुपये, रब्बी कांदा २२५ रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in/ या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

भगवान कानडजे पाटील यांची नागपूर येथे जागर माय मराठीचा या राज्यस्तरीय कवी संमेलनात निवड...

जनसंचलन/बुलढाणा

मराठी भाषा विभाग धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर व चारोळी मंच पुणे शाखा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे जागर माय मराठीचा राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी मातोश्री विमलताई देशमुख सभागृह नागपूर ,येथे करण्यात आले. या राज्यस्तरीय कवी संमेलनात बुलढाणा येथील नवोदित कवी उत्कृष्ट चारोळीकार व गझलकार भगवान कानडजे पाटील यांची विषमतेचा काटा या कवितेची जागर माय मराठीचा या राज्यस्तरीय कवी संमेलनात निवड झाली आहे . या राज्यस्तरीय कवी संमेलनाला संमेलनाध्यक्ष म्हणून चंद्रकांतदादा वानखेडे प्रसिद्ध साहित्यिक पुणे व उद् घाटक ॲड नीताताई कचवे अध्यक्ष बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती, शंकर घोरसे अध्यक्ष अक्षर क्रांती फाउंडेशन नागपूर ,प्रभाकर तांडेकर ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक नागपूर, डॉ प्रणव कोलते प्रा.संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती,प्रशांत कोठे प्राचार्य धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर, अरुणा सोनी प्रसिद्ध समाजसेविका उद्योजक नागपूर यांच्या उपस्थितीत संमेलन आयोजित केले आहे,या संमेलनाला राज्यभरातून साहित्यिक सारस्वतांची उपस्थिती राहणार आहे. साहित्य प्रेमींनी या संमेलनाला उपस्थित रहावे असे आवाहन

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणुक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणुक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	–
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	–
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	–

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१००००३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

झिरो माईल विकास प्रकल्पाला केंद्राची साथ...

समन्वयासाठी दोन अधिकारी नियुक्त

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या पाठपुराव्याला यश

वृत्तसंस्था/मुंबई

नागपूरच्या ऐतिहासिक झिरो माईल स्मारकाच्या विकासासाठी आता केंद्र शासनाचे सहकार्य मिळणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठपुराव्यानंतर केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने या प्रकल्पासाठी दोन अधिकारी समन्वयासाठी नेमले आहेत. मुख्यमंत्री कार्यालयातून केंद्र शासनाकडे झिरो माईल स्मारक स्थळाचा सांस्कृतिक वारसा म्हणून विकासासंदर्भात पाठवलेल्या पत्रावर कार्यवाही करत केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव अभय करंदीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या पत्रात करंदीकर यांनी नमूद केले आहे की, नागपूर महानगरपालिका झिरो माईल स्मारकाच्या नूतनीकरण, आधुनिकीकरण आणि विकासाची कामे राबवत आहे. हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असून केंद्र सरकार या प्रकल्पासाठी संपूर्ण सहकार्य करेल. यासाठी सर्व्हे ऑफ इंडिया विभागामार्फत दोन अधिकारी समन्वयासाठी नेमण्यात आले आहेत. अतिरिक्त सर्वेयर जनरल संदीप श्रीवास्तव यांची नोडल अधिकारी म्हणून तर सर्व्हे ऑफ इंडिया, पुणेचे संचालक ए. के. सिंह यांची सहाय्यक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. हे अधिकारी राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून प्रकल्पाची अंमलबजावणी करतील. झिरो माईल हे भारताचा भौगोलिक केंद्रबिंदू मानला जातो. या स्मारकाचा विकास केवळ नागपूरच्या ऐतिहासिक ओळखीत भर घालणार नाही, तर शहरातील सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना देणार आहे.

झिरो माईल हे स्मारकाचा विकास हा नागपूरच्या वारशाला नवी दिशा देणारा प्रकल्प ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मिळालेल्या सहकार्यामुळे हा परिसर जागतिक दर्जाच्या वारसा स्थळाप्रमाणे विकसित होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

मिशन परिवर्तन अंतर्गत निबंध, चित्रकला स्पर्धेत प्रबोधन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा जिल्हा पोलिस दल आणि बुलढाणा जिल्हा पत्रकार संघातर्फे मिशन परिवर्तन अंतर्गत नशामुक्ती विषयाला घेऊन ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या निबंध-चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारोह प्रभा हॉल, पोलिस मुख्यालय, येथे आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत जिल्हयातील शाळा, महाविद्यालयातील जवळपास ८ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत प्रबोधन विद्यालयाच्या तिन विद्यार्थ्यांनी चित्रकला व निबंध स्पर्धेत पारितोषिके मिळवली. श्रेयश जाधव या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांने वर्ग ५ ते ७ गटातून चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला त्याला ५ हजार रूपये रोख, प्रमाणपत्र व सन्माचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उदय गुळवे या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी वर्ग ८ ते १० गटातून चित्रकला स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला त्याला २ हजार रूपये रोख प्रमाणपत्र व सन्माचिन्ह तर तेजल गावंडे या इयत्ता नववी च्या विद्यार्थीने निबंध स्पर्धेत प्रोत्साहनपर बक्षिस मिळविले तिला ५०० रूपये रोख प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह पोलिस अधिक्षक निलेश तांबे, अप्पर पोलिस अधिक्षक अमोल गायकवाड व पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीत राजपूत यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल प्रबोधन विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक चंद्रकांत जोशी यांच्या हस्ते तिनही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वाधार योजनेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत करता येणार अर्ज

जनसंचलन/बुलढाणा

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या तसेच शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी. १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे. जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेच्या निकषानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता ऑनलाईन पध्दतीने **https://hmas.mahait.org** या संकेतस्थळावर अर्ज करणे करणे आवश्यक आहे. मागील शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी सुध्दा योजनेच्या निकषाप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ आहे. स्वाधार योजनेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी कार्यालयातील सुचना फलकावर लावण्यात आलेली असून विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे

शेतकऱ्यांसाठी लढणे हे पुण्याचं काम रविकांत तुपकर

जातीसाठी लढता, आता मातीसाठी लढा! तुपकरांचा एल्गार..!

जनसंचलन/बुलढाणा

मलकापूर तालुक्यातील बेलाड येथे आज क्रांतिकारी शेतकरी संघटना द्वारा आयोजित एल्गार सभेत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांवर जोरदार हल्ला चढवत शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीव्र लढ्याचा इशारा दिला. शेतकऱ्यांच्या खिशात पैसा आला की बाजारात पैसा येतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढणे हे पुण्याचं काम आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी, कितीही संकटं आली तरी आम्ही लढत राहू,असे तुपकर म्हणाले. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांवर झालेलं कर्ज हे सरकारच्या चुकीच्या धोरणांचं फळ आहे. मी आमदार, खासदार नाही झालो तरी चालेल, पण शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच माझं सर्वोच्च प्राधान्य आहे.फक्त तुपकर यांनी शेतकऱ्यांना एकजुटीचं आवाहन करताना म्हटलं, शेतकऱ्यांनो, तुमच्या अंगावर कोणतंही संकट आलं तरी एकजूट ठेवा. एकजुटीची ताकद मोठी असते. पंजाबच्या शेतकऱ्यांप्रमाणे प्रदीर्घ लढ्याची तयारी ठेवा. जातीसाठी जसं लढता, तसं आता मातीसाठी लढा.फक्त सरकारवर टीका करताना ते म्हणाले, ङ्गसोयाबीन आणि कापसाचे भाव देणे ही सरकारची जबाबदारी आहे. सोयाबीनचे भाव सोयापेंड निर्यातीवर अवलंबून आहेत, म्हणून निर्यातीला प्रोत्साहन दिलं पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी जसे संघटित आहेत, तसे विदर्भातील शेतकरीही संघटीत झाले पाहिजेत.फक्त शेतकरी वर्गातील वाढत्या असंतोषाचा उल्लेख करताना त्यांनी इशारा दिला की, शेतकऱ्यांची पोरांची आज लग्न होत नाहीत, शेतकरी संकटात आहेत. उद्या त्यांच्या संतापाचा उद्रेक झाला आणि मंत्र्यांच्या गाड्या फोडल्या, तर त्यात नवल वाटू नये.फक्त ङ्गदेशाचं स्वातंत्र्य आंदोलनातून मिळालं, तसेच शेतकरी प्रश्नही आंदोलनातूनच सुटणार आहेत. मत मागणाऱ्या उमेदवारांना विचारलं पाहिजे तुम्ही किती वेळा शेतकऱ्यांसाठी आंदोलन केलं?फक्त असा प्रश्न तुपकर यांनी उपस्थित केला. ङ्गमागील वर्षी शेतकऱ्यांसाठी लाठीचार्ज झाला तरी आम्ही मागे हटलो नाही. शेतकऱ्यांचा हक्काचा पिकविमा घेतलाच,फक्त असं सांगत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील आपल्या वचनबद्धतेची पुनरुज्जीवित घोषणा केली. या एल्गार सभेला परिसरातील शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती लाभली होती . कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी अमोल राऊत सचिन शिंगोटे यांसह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते यांनी पार पाडली

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२७७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८